# नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नाशिक.

प्रधान कार्यालय, द्वारका सर्कल, मुंबई आग्रा महामार्ग, नाशिक ४२२०११

**: पाहिजेत :**

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्क लि.,नाशिक यांच्या आस्थापनेवरील ज्यु. क्लार्कची रिक्त पदे भरण्यासाठी निवड सुची तयार करण्यासाठी खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळ सेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या., पुणे (एमकेसीएल )या शासन मान्य संस्थेमार्फत अर्ज मागविणेत येत आहेत.

संवर्गाचे नांव - ज्यु क्लार्क - १८९ पदे

| प्रवर्गानुसार भरावयाच्या जागा | अ.जा | अ.ज. | विज अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला | ७ | १२ | २ | २ | २ | २ | १ | ८ | २१ | ५७ |
| अपंग | १ अंध | १ अंध<br>१ मुकबधीर | १ मुकबधीर | ० | १ मुकबधीर | ० | ० | १ अस्थिव्यंग | १ अंध<br>१ मुकबधीर | ८ |
| माजी सैनिक | ४ | ६ | १ | १ | १ | १ | १ | ४ | ११ | ३० |
| प्रकल्पग्रस्त / भुकंप-ग्रस्त | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | १ | ४ | ८ |
| प्रवर्गातील इतर | ११ | १९ | १ | २ | २ | २ | २ | १४ | ३३ | ८६ |

उपरोक्त जागांची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

**शैक्षणिक अर्हता :-** उमेदवार महाराष्ट्र राज्यातील मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा,उमेदवारास पदवी परिक्षेत ५५ % किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेले असावेत , वाणिज्य पदवीधर असल्यास त्यास ५० % किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेले असावेत. तसेच उमेदवार एम एस सी आय टी परिक्षा उतीर्ण असावा.

**अटी व शर्ती :**

१. अर्जदाराचे वय दि. ०६/०६/२०१२ रोजी १८ वर्षे पूर्ण असावे. तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे , अंध , अपंग यांचेसाठी जास्तीत जास्त ४५ वर्षापर्यत शिथिलक्षम राहिल.

२. मागासवर्गीय उमेदवारांना भविष्यात नेमणूकीनंतर ६ महिन्याचे आंत जात प्रमाणपत्र पडताळणी दाखला (Caste Validity Certificate ) बॅकेस सादर करणे बंधनकारक राहिल.

३. निवडीचे अनुषंगाने कोणत्याही उमेदवाराशी पत्रव्यवहार केला जाणार नाही. निवड प्रक्रिया कोणत्याही टप्पावर थांबविणे अथवा रद्द करण्याचे अधिकार बॅकेने राखून ठेवलेले आहेत.

४. उमेदवारांना बॅकेच्या नियमानुसार व संचालक मंडळ वेळोवेळी निश्चित करेल त्याप्रमाणे वेतन व भत्ते दिले जातील.

- **निवड कार्यपध्दती**

**अ) लेखी परिक्षा :-** उमेदवारांची ७५ गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व पर्यायी स्वरुपाच्या असतील. यामध्ये बँकिंग, इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांचा समावेश असेल.

**ब) मुलाखत :-** लेखी परिक्षेत यशस्वी होणाऱ्या उमेदवारांना बँक धोरणानुसार भरावयाचे पद संख्येच्या प्रमाणात लेखी परिक्षेचे गुणानुक्रमे २५ गुणांसाठी मुलाखतीस बोलविण्यात येईल.

**क) उमेदवारांची अंतीम निवड सुची :-** निवड समिती प्रतिनिधींनी मोजदाद केलेल्या मुलाखत गुणांची सरासरी अधिक लेखी परिक्षेतील गुण यांचे गुणानुक्रमे अंतीम निवड सूची तयार करण्यात येईल.

**ड)** उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो निवडीस पात्र राहाणार नाही.

भरावयाच्या श्रेणी व प्रवर्गनिहाय रिक्त पदाकरीता खालीलप्रमाणे परिक्षा शुल्क आकारले जाईल.

खुला प्रवर्ग प्रत्येकी :- रु.४००/-

मागासवर्गीय प्रवर्ग प्रत्येकी :- रु.२५०/-

सदर परिक्षा शुल्क हे नापरतावा राहील. परिपुर्ण अर्जासोबत परिक्षा शुल्क रोखीने स्विकारण्याची सोय एमकेसीएलच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर (ALC-Authorised Learning Center) करण्यात आलेली आहे. एमकेसीएल च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रांची माहिती यादी http://oasis.mkcl.org/ndccb या संकेत स्थळावर तसेच बँकेच्या सर्व विभागीय कार्यालयात उपलब्ध आहे. अर्ज परिपूर्ण असल्यास रक्कम स्विकारली जाईल व त्याबाबतची पोहोच तसेच उमेदवाराने भरलेल्या अर्जाचा गोषवारा तक्ता (समरी शीट ) सदर अधिकृत केंद्राकडून देण्यात येईल.

**अर्ज करण्याची पध्दती :-**

१. विहित नमुन्यातील अर्ज दिनांक ०६/०६/२०१२ पासून एमकेसीएलच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर (ALC-Authorised Learning Center) रुपये २५/- भरुन उपलब्ध होतील. सदर अर्ज एमकेसीएलच्या केंद्रावर कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० वाजेपासून सायंकाळी ५.३० पर्यंत स्विकारले जातील. अर्ज स्किारणेची अंतीम तारीख २०/०६/२०१२ रोजी सायंकाळी ५.३०वाजेपर्यंत राहील. उमेदवाराचे एमकेसीएलच्या संबंधीत अधिकृत केंद्रामार्फतच भरलेले अर्ज स्विकारले जातील. ज्या उमेदवारांनी या जाहिरातीपूर्वी बॅंकेकडे अर्ज सादर केलेले असतील त्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. या उमेदवारांनी जाहिरातीप्रमाणे नव्याने अर्ज करावयाचे आहेत.

२. उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो लावावा.

३. उमेदवाराने अर्जासोबत कोणत्याही प्रकारचे दाखले / प्रमाणपत्र जोडू नयेत.

**लेखी परिक्षेबाबतच्या सुचना :-**

१. या लेखी परिक्षेसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेची रुपरेषा , मॉडेल पेपर , उत्तर पत्रिका , हॉल तिकीट नमुना , वेळापत्रक , परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती एमकेसीएलच्या http://oasis.mkcl.org/ndccb या संकेत स्थळावर उपलब्ध राहील तसेच याबाबत वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीही देण्यात येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही याची विशेष नोंद घ्यावी.

२. उमेदवारास परिक्षेसाठीचे ओळखपत्र त्याने अर्ज दाखल केलेल्या एमकेसीएलच्या केंद्रवर उपलब्ध राहील.तसेच ओळखपत्रात नमुद केलेल्या परिक्षा केंद्रावर परिक्षेच्या दिवशी परिक्षेपूर्वी बैठक व्यवस्था पहावयास मिळेल.

**सर्वसाधारण सुचना :-**

१. उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२. लेखी परिक्षेनंतर ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलवावयाचे आहे, अशा उमेदवारांना मुलाखतीपुर्वी कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविले जाईल.

३. उपरोक्त पदाच्या सरळ सेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे यांचेमार्फत अर्ज मागविणेत येत आहे. भरती प्रक्रियेबाबतची माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे यांचे http://oasis.mkcl.org/ndccb या संकेत स्थळी दि. ०६/०६/२०१२ पासून पहावयास उपलब्ध होणार आहे.

४. सहाय्यक संचालक , जिल्हा रोजगार व स्वय:रोजगार मार्गदर्शन केंद्र, नासिक व प्रकल्प अधिकारी , एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, नासिक या कार्यालयाकडून शिफारस झालेल्या उमेदवारांनी जाहिरातीत विहित केलेले परिक्षा शुल्क भरुन अर्ज करणे आवश्यक राहील. सदर अर्ज न करणारे उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. सदरहु सेवायोजन कार्यालयाकडून शिफारस केलेल्या उमेदवारांना बॅन्केने जाहिराती नुसार अर्ज करणेबाबत पत्राने कळविलेले आहे.

५. काही अपरिहार्य / आपतकालिन कारणास्तव परिक्षा स्थगित करणे , पुढे ढकलणे , अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार निवड समितीचे अध्यक्ष राखून ठेवीत आहेत. भरती प्रक्रिये संबंधात उदभवणारे वाद , तक्रारीबाबत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

६. बॅंकेकडे थेट आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही

७. उमेदवारांना लेखी परिक्षा , कागदपत्रे पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल.

८. भरती प्रक्रियेत / निवड कार्य पध्दतीत बदल करण्याचा अधिकार निवड समितीस असेल व ऐनवेळी काही बदल झाल्यास तो वर्तमान पत्रात व एमकेसीएलच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना पत्राने लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.

९. अपंगासाठी आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवाराने त्याचे अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असलेबाबतचे विहित नमुन्यातील जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र पडताळणीवेळी दाखल करणे आवश्यक राहील.

नाशिक

तारीख : ०६/०६/२०१२ मुख्य कार्यकारी अधिकारी चेअरमन

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्क लि., नाशिक